श्री साईनाथ प्रसन्न.

# श्री साईलीला

## मासिक पुस्तक.

वर्ष ४ थें.] वैशाख शके १८४८ [अंक २ रा.

नलिनीदलगत जलमतितरलम् । तद्वज्जीवनमतिशय चपलम् ॥



क्षणमपि सज्जनसंगतिरेका । भवति भवार्णव तरणे नौका ॥

श्री शंकराचार्य.

संपादकः—लक्ष्मण गणेश महाजनी.

प्रकाशकः—रामचंद्र आत्माराम तर्खड.

श्री साईलीला कचेरी ५ टर्नर रोड बांद्रे, बी. बी. रेल्वे.

# अनुक्रमणिका.


| | |
|---|---|
| महाराजांचे अनुभव ... ... ... ... | ४५९-४७२ |
| श्री साईसच्चरित ... ... ... ... | ६६३-६७८ |


## मासिकाच्या वर्गणीदारांस विनंति.

हें मासिक सुरू करण्यांत याच्या चालकांचा हेतू याची छपाई व खर्चवेंच भागून राहिलेलें उत्पन्न श्रीसाईबाबांच्या एखादे फंडास जमा व्हावें असा असल्यामुळें, प्रत्येक वर्गणीदारानें मनांत आणल्यास आपापल्या स्नेह्यां-मधून निदान एकतरी वर्गणीदार मिळविण्याचें श्रेय घेतल्यास एकंदरीनें कितीतरी मदत केल्यासारखें होणार आहे. शिवाय अशा रीतीनें मदत कर-णाऱ्यानें श्रीसाईसमर्थांची पर्यायानें सेवा केल्यासारखेंच होणार आहे.

यापुढें श्रीसाईलीलेचे अंक दर महिन्याचे पौर्णिमेपर्यंत पोष्टांत पड-तील व ते ग्राहकांस दर महिन्यास वद्य १० पर्यंत पोहोंचले जातील अशी तजवीज ठेविली आहे. पोष्टांत क्वचित् अंक गहाळ होत असतील व यामुळें जर ग्राहकांनीं अंक न मिळाल्याची तक्रार पुढील महिन्याचे अमावास्येपर्यंत आमचेकडे केली तरच त्यांना पुन्हां अंक पाठविण्यांत येईल.

या मासिकासंबंधानें पत्रव्यवहार करणें तो खालीं सही करणार यांचे नांवानें खालीं लिहिलेल्या पत्त्यावर करावा.

गोविंद रघुनाथ दाभोळकर.

श्रीसाईलीला ऑफिस, ५ सेंट मार्टिन्स रोड, वांद्रे बी. बी. सी. आय्. रेल्वे.

## वर्गणीचे दर

वार्षिक वर्गणी टपाल खर्चासह मनीआर्डरनें अगाऊ रु. ३।=व्ही. पी. नें रु. ३॥. चालू अंक -।=. मागील अंक शिल्लक असल्यास -॥-.

पूर्वीच्या अंकांत व्ही. पी. नें रु. ३॥= चुकून छापलें गेलें. तसेंच यंदा च्या कांहीं वर्गणीदारांकडे रु. ३॥। ची व्ही. पी. चुकून गेली, त्यांचे -।- आमचे-कडे जमा आहेत. अशा वर्गणीदारांनी -।- परत मागितल्यास पाठवून देऊं.



(मागील अंकावरून पुढें चालू.)

### भुजंगप्रयात.

विचारा बुवा बैसला दूर जागीं । तरी होइ तत्शुद्ध बुद्धी न जागी ।
दिसे कावरा बावरा आणि क्रोधी। परी आपुली चूक ना चित्ति शोधीं॥

### यूथिका.

सद्गुरू चरण पंकज चेपिले । घेउनि मग उदी पद वंदिले ।
येउ देत न नजीक बुवाजिला । होइ शीण अमुच्याहि जिवाजिला ६४

### शिखरिणी.

(आम्ही हवाखाण्यास निघालों; कावजीची बडबड)

निघालों खाण्याला मग मधु मरुत्शीत लहरी ।
विकल्पांही दंशें चरळत बुवा त्यासि लहरी ।
मधें येती जाती, कवण विषबाधानळ हरी ।
दुजा साईनाथाविण भुवि न गारुडि लहरी ॥ ६५ ॥

### शार्दूलविक्रीडित.

घेऊनी अति मंद शीतल हवा वाड्यामधीं पातलों ।
भेदाभेद असेल कां गुरुपदीं ? चर्चा करूं लागलों ।
बोले कावजी जें मनीं मज असे सांगे जरी तो मला ।
मी मानीन तरीच साधु मम त्या साइ जगद्वत्सला ॥ ६६ ॥

### आर्या.

सद्भक्त देशपांडे आले इतुक्यांत आमुच्या जवळी ।
ऐकुनि चर्चा वदती बोवासी संशयासि जो कवळी ॥ ६७ ॥

### पृथ्वी.

(माधवराव व कावजी.)

तुम्हा तुमचिया मनीं वसत जें असें काय तें ।
तुम्ही नच पुसा तया, परि पुसेन मी आयतें ॥

---

१ मरुत्=वारा=गोड व थंड हवेच्या झुळ्का २ सर्प ३ चावण्यानें ४ विषलहरी ५ ताप ६ हरण करील ७ स्वैरवर्तन करणारा.

वदेन मग मी तुम्हां कथिल जें गुरुमाय तें ।
न ठेवि तुमच्या मनीं खचित संशया ठाय तें ॥ ६८ ॥

## दिंडी.

( कावजी. )

वेणी गांवीं सुंदरा एक देवी । मला वाटे तेथुनी ती अणावी ।
मियां निर्मित मंदिरीं मदिय गांवीं । स्थापुनी ती मग नित्य पुजित जावी
अशी इच्छा मम जीविं असे राया । विना पुसिल्या ती सांगुद्या हरी या

( माधवराव. )

तुम्ही बोला नच मात ही तयासी ।
स्वयं स्फूर्त्या कथुं द्याच परेशासी ॥ ७० ॥
वरें पाहूं उदयीक काय होतें ।
राव कथि ऐसें जाई भोजनातें ॥
अम्ही जेउनि मग मधुर शयन केलें ।
नवल श्रवणाला श्रवण हे भुकेले ॥ ७१ ॥

## घनाक्षरी.

दुसरे दिवशीं प्रातःकालीं । पुनरपि गेलों वैभवशाली ।
मशिदी माजी तो शशिमौली । विलसे ज्या स्थानीं ॥ ७२ ॥

## स्वागता.

देखिलें मग तया हृषिकेशा । वंदिले अति मुदा जगदीशा ॥
कावजीहि मग घे पदभेटी । नाहिं नाहिं म्हणतां जगजेठी ॥ ७३ ॥

---

१ जागा २ नगर जिल्ह्यांत या नांवाचें एक गांव आहे ३ माधवराव ४ साइशंकराला ५ माधवराव ६ साइशंकर

### पद—कोप कसा आला

(प्रियासी कोप कसा आला—या चालीवर)

(संतवृत्तीबद्दल माझे विचार.)

राग कुठें गेला, प्रभूचा राग कुठें गेला ॥ धृ ॥ कावजीला अजी वंदु दिलें कां। अशंरण पद जें वंद्य त्रिलोकां ॥ कोप तयावरि असुनि, विलोका। करित कशी ही लीला ॥ प्रभूचा ॥ २ ॥ संता निंदी भाव नठे वी। सत्वरि कां त्या भेटी द्यावी ॥ हें समजावें म्हणुनी दावी। उग्र अशा स्वरुपाला ॥ प्रभूचा ॥ २ ॥ राग परी अनुराग तदोदरीं। कटु औषध सुख परिणामांतरीं ॥ साइ दयाघन सम अखिला वरि। वर्षत प्रेम जलाला ॥ प्रभूचा ॥ ३ ॥ ७४ ॥

### पद—राधावरमधु मिलिंद—या चालीवर

(बाबांचे ऐश्वर्य)

योगेश्वर, यतिप, संत। जयजय व्रंतीगणवनवसंत ॥ धृ० ॥
संसारार्णवमग्न जनांची। असत सुनौका अनंत ॥ जयजय ॥ १ ॥
परमार्थाटवी भ्रांतनतांचा। मार्गदर्शि यशवंत ॥ जयजय ॥ २ ॥
परब्रम्हिच्या साम्राज्याचा। सार्वभौम भगवंत ॥ जयजय ॥ ३ ॥ ७५ ॥

### सवाई

साइ सदाशिव पाद सरोरुह संनिध जाउनि बैसुनि ठेलों।
ज्ञान निरंजन निर्मल निर्गुण श्रीपति वैभव पाहुनि धोलों ॥
माधवरावहि संनिध बैसुनि देवपदांबुज चेपित होते।
कावजि दूरचि बैसुनि पाहत सद्गुरु कौतुक धन्य अहो तें ॥७६॥

---

१ कोणालाही शरण न जाणारे २ कोप ३ प्रेम ४ यतिश्रेष्ठ ५ भक्त ६ अटवी=अरण्य ७ नम्र झालेलें कमल. ८ कलम ९ तृप्त झालों.

## आर्या

आर्तांनीं, भ्रांतांनी, श्रांतांनीं विविध हेतु लोकांनीं ।
भरली मशीद सारी, त्यांच्या तैशीच करुण हाकांनीं ॥७७॥

( बाबांची लीला )

इतक्यांत गर्दिमधुनी एका मनुजास मारुनी हाका ।
" कोंड्या इकडे येरे" पुसती प्रभु त्यासि काय तें ऐका ॥७८

( कोंडूस प्रश्न )

" इतके दिन बा कोठें गेला होतासि तं कुणापाशीं ।
कारण सत्यचि वदरे " पुसते झालेचि साइ हृषिकेशी ॥७९॥

## शिखरिणी.

( कोंडूचें उत्तर )

वणी गांवीं बाबा नमन करण्या देव बरवा ।
प्रभो गेलों होतों मजवरि कृपा दृष्टि फिरवा ॥

( बाबांचा पुन्हा प्रश्न )

पुसे सर्वव्यापी अनृत वदला जाणुनि मंनां ।
" नसे येथें कोंड्या शिरडिमधि का देव नमना" ॥ ८० ॥

## द्रुतविलंबित

( कोंडूचें उत्तर )

अनृत कां कवटाळिसि तूं वृथा । वदसि सत्य न कारण कां यथा ।
मग वदे "वणिमाजि असे सुता । तदिय भेटचि कारण तत्वता ॥८१॥

## पृथ्वी.

( बाबांचे बोल )

आतां वदसि तूं खरें, अनृत कां वदावें गिरा ?।
बरें वद आहे कि ना वणित एक देवी बरा ? ।

१ मनानें.

वसे न अशि काय ती खचित खूर मांडीवरी ?।
शिरीं न कर वांकडा नथ न नाकिं मोठी धरी ? ॥ ८२ ॥

### घनाक्षरी.

( माधवराव व बाबांचा संवाद व सवाल )

माधवरावें पाहुनि अवघी । या बोलाची साधुनि संधी ॥
हळुच पृच्छिलें त्या करुणाब्धी । ऐका स्वस्थ मनें ॥ ८३ ॥

### दिंडी.

खरच देवा या गरिब पाटलानें । लघू मंदिर निज गांवि प्रयासानें ।
बांधियेलें त्यामधीं बैसवावी । वणी देवीला हेतु असे जीवीं ॥८४॥
बैसवावी कां नाहिं वणीदेवी । सांग ईशा त्वत्पदीं शीर ठेवी ।

( बाबांचें उत्तर. )

नाथ आपुला जो असे दगड धोंडा । तोच ठेवावा आणुं नये चंडा ॥

### सवाई.

( माधवरावांचा पुन्हा सवाल, बाबांचें उत्तर. माधवरावांचा पुन्हां सवाल. )

त्यावरि माधवराव विचारित संतविभूषण नाथ वराला ।
काय असे प्रतिबंध तयालयिं स्थापन देविच ती करण्याला ॥
देव वदे बसवावि न वा बसवावि जसें तुज वाटत श्यामा ।
श्याम पुसे कथि निश्चित एकचि ना दुसरें वद अंबुद श्यामा ॥ ८६ ॥

### पंचचामर.

( बाबांचें उत्तर. )

तयाचि मंदिरांत तीच बैसवावि हें मनीं ।
असे जरी तरी तिचेच पाद पाणि तोडुनी ।

खुशाल मंदिरांत बैसवावि तीच देवि रे ।
नको पुसूं पुन्हां मला, वचनिं लक्ष ठेवि रे ॥ ८७ ॥

पद—अरसिक किति हा शेला—या चालीवर.

( व्रात्रांची गोष्ट )

श्रवण करी गा श्यामा । कथितों मातचि येइल कामा ॥ श्रवण ॥धृ ॥
अवसरिं एका यामा । घेउनि संगे सुहृद सुदामा ।
विचरत होतो ग्रामा । मार्गीं भेटलि गौ रे वामा ॥ श्रवण ॥ १ ॥
तिजसह जात मुक्कामा । तेथें करुनी स्वल्प विरामा ।
नवलचि दिसलें श्यामा । आली मोठी मरि त्या ग्रामा । श्रवण ॥२॥
दिसत न सुहृद अनामा । चिणला होता भिंतित धामा ॥
तदुपरि जें जें श्मामा । घडलें नकळे ठावें रामा ॥ श्रवण ॥ ३॥ ८८ ॥

भुजंगप्रयात.

माझे विचार.

अहो साइची येइ शक्रास शैली । जरी खर्चि तो स्वर्ग–पुण्याइ-थैली ।
पराच्या मनीचें कसें गूढ ताडी । त्रितीया मुखांतूनि बाहेर पाडी॥८९॥

दिंडी.

संतवचनामृत नित्य मधुर साचें । त्यांत मिश्रण नच असत कटुरसाचें
ज्ञान नव्हतें हें दीन पामरांना। म्हणुनि संशय नच पळत माळराना९०

आर्या.

वंदुनि श्रीचरणाला आम्ही गेलों मशीद सोडूनी ।
भोजन करुनि पुनरपि आलों बसलों करांसि जोडूनी ॥
माधवरावहि होते तेथें चेपीत पाय देवाचे ।
देखुनी आम्हा, ऐका, देवाला काय ते वदे वाचें ॥ ९१ ॥

---

१ गोष्ट. २ माधवराव

### भुजंगप्रयात.

माधवरावांनीं केलेलें बाबांचें स्तवन.

कृपासागरा श्री परब्रह्म हंसा। वदे रे वदे साइ संतावतंसा।
तुझ्या मोत बोधामृतासी पियावें। कळेना कसें संशया घालवावें ९२

### पद

तूं माझा यजमान—या चालीवर.

माधवरावांचा पुन्हां सवाल.

तूं अमुचा अधिराज। साई तूं अमुचा अधिराज॥ धृ०॥
बोल तुझे ते नसती लटके। असती सत्यचि अमृत गुटके।
सदैव लाविति अंतरि चटके। शरण तुला यदुराज॥ साइ॥ १॥
कोप न करिशी अज्ञ शिशूंवरि। काय करावें, अमुच्या अंतरिं।
समज पटेना अजुनी तिळभरि। काय कथूं दिनराज॥ साइ॥२॥
इच्छी जरि पाडिल ती देवी। आणुनि मंदिरिं रे स्थापावी॥
असेल हरकत तरि ती दावी। पुनरपि हे गणराज॥ साइ ३॥९३॥

### घनाक्षरी.

बाबांचें उत्तर.

ठेवी आपुला पथ्थर धोंडा। आणुं नये रे ती चौमुंडा।
किति रे करिशी वटवट तोंडां। करि जें योग्य दिसे॥ ९४॥

### प्रहर्षिणी.

( माधवरावांचा पुन्हां प्रश्न )

गोविंदं करुणरसार्णवं मुकुंदं। विश्वेशं हिमनगजाधवं महेशं।
धातारं ममजननीं च साइदेवं। मार्थे त्वां पुनरपि वक्तुमयि प्रसीद॥९५॥

---

१ भूषण २ गोष्टरूपी ज्ञानामृतास. ३ देवी.

अर्थ:—

ज्यानें आपला इंद्रियगण जिंकलेला आहे, जो करुणरसाचा सागर आहे असा जो तूं रमारमण मुकुंद ब्रह्मांडनायक, पार्वतीरमण असा जो तूं महेश, विश्व निर्माण करणारा तूं ब्रह्मदेव, माझी माय तूं साई देव, पुन्हां एकदां बोलण्याकरतां तुझी प्रार्थना करतों. माझ्यावर कृपा कर.

## साकी.

बाबांचें निर्वाणीचें उत्तर.

आम्ही बोलतों तोंडानें कां ××× रे श्यामा।
पुन्हः पुन्हां किती बडबड करिशी मज न, कळें श्रीरामा॥
मेरा भिसमिल्ला। भला करेगा अल्ला॥ ९६॥

## पृथ्वी.

माझे विचार.

मनोगत सुजाणुनी पटविली जगन्नायकें।
खुणा, मिटविली अधी, परि न कावजी आयके।

कावजीचे विचार.

म्हणे वदत सत्य हा जरि विभू मला ना रुचे।
वणी रुचिर देवते विण दुजें तिजें ना सुचे॥ ९७॥

माझे विचार.

चिकित्सक हि लाधला जरि भला, परी जो कुधी।
वदा खचित सेवि कां जरि दिली हि दिव्यौषधी।
प्रवृत्तिच जयाचि कीं निरस नित्य कांजी पिणें।
सुधा जरि दिली, न, पी, करि न काय वांया जिणें॥ ९८॥

१ मनाचा रोग. २ वैद्य, डाक्तर, ३ अश्रद्धाबुद्धी ४ स्वभाव, संदय

### शिखरिणी.

मला वाटे देवें कथुनि मनिचें निर्णय दिला ।
तरी ना पृच्छावें पुनरपि तया गौरिपतिला ।
म्हणोनी रावातें खुणवि विनवी मी न शिणवा ।
शिवा साईनाथा नच सम जया अन्य कणवा ॥ ९९ ॥

### आर्या.

आम्ही शिरडी सोडली.

नमुनी श्रीपदयुगला शुभ आशी शुभ उदी शुभा आज्ञा ।
घेउनी, मशीद माई सोडुं पुन्हा वंदु साइ सर्वज्ञा ॥ १०० ॥

### दिंडी.

आम्ही गेलों मग पारनेर गांवा । जेथ होते कुळकर्णि योगि बावा ।
देवे दाजीसाहेब त्याच ग्रामीं । रहत होते मम परम मित्र नामी ॥१०१॥

### आर्या.

भेटुनि, बोलुनि, प्रेमें संगें जेवूनि देवरायांचें ॥
पुसुनी कुशल निघालों, दर्शन घेऊनि योगिरायांचें ॥ १०२ ॥

### दिंडी.

केडगांवीं उतरलों दर्शनाचा । लाभ होइल वाटलें पदरजांचा ॥
परी कळलें श्री संतमूर्ति राही । बाइ अंजनिच्या मुंब नगरगेहीं॥१०३॥

### आर्या.

पुण्यास आलों.

विद्वद्रसिक गुणीजन आश्रय जी शोभते म्हणूनि धुरीं ।
शूरां धीरां तैशी, झालों त्या मग पुराण पुण्यपुरी ॥ १०४ ॥

---

१ श्रीयाळ. २ विष्णु लक्ष्मण उर्फ दाजीसाहेब देव ३ योग्य. गोड
४ अग्रभागी

## इंद्रवज्रा.

श्री पर्वतीचे प्रिय दर्शनाशी । गेलों त्वरें जी अघराशि नाशी ॥
वंदूनि त्या शंकरवल्लभेला । तेथूनि गेलों मग आलकेला ॥ १०५ ॥

## मंदाक्रांता.

आळंदीस आलों.

इंद्रायण्या मधुरममलं पावनं कं प्रणम्य ।
स्नात्वातस्मिन्प्रथममलकेशस्य धाम्नश्च शृंगं ॥
नत्वा पश्चात्रिगुणरहितं साधु चूडामणिं च ।
साष्टांगैस्तं भवभयहरं सद्गुरुं प्राणमाम ॥ १०६ ॥

अर्थः—इंद्रायणी माईच्या गोड, स्वच्छ व पवित्र अशा उदकास वंदन करून त्यांत स्नान केलें व प्रथम अल्काधीश श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या मंदिराच्या कळसाचें दर्शन घेऊन नंतर त्रिगुणातीत संत शिरोरत्न भवभय हरण करणारे सद्गुरु ज्ञानेश्वरांना साष्टांग नमस्कार घातला.

## आर्या.

कराडास गेलों.

वंदन केलें पुनरपि योगेश्वर ज्ञानरत्न चिच्चरणीं ।
तरणी भवांबुधीची, कीं जो, अज्ञान घन तमा-तरणी ॥ १०७ ॥
नंतर कवाडक्षेत्रीं अलकेहुनि धांव घेतली सपदी ।
कर जोडुनि शिर ठेवूं संत सखाराम पुण्यरुचिरँपदीं ॥ १०८ ॥

## घनाक्षरी.

तेथुनि गेलों मुंबापुरिला । अंजनिबाईच्या गेहाला ॥
श्रीनारायण मुनिराजाला । वंदियलें भावें ॥ १०९ ॥

---

१ पातक २ आळंदी ३ ज्ञान ४ नौका ५ अज्ञानरूपी निबिड किंवा दाट अंधःकार तो घालविणारा सूर्य. ६ लागलीच. ७ मनोहर.

कथिली सर्वहि कावजी वार्ता । श्रीबाबाजी वदले आर्ता ॥
पुसिलें सांगा त्या शिवसंता । अर्था साईंच्या ॥ ११० ॥

## साकी.

बाबांबद्दल नारायण महाराजांचे उद्गार.

साईबाबा जें जें वदले तें तें सत्यचि माना ।
येईल त्याचा प्रत्यय पुढती शंका नच घ्या नाना ॥
वचनीं भाव धरा । सदैव सत्यचि साइगिरा ॥ १११ ॥

## स्रग्धरा.

माझें कावजीस सांगणें.

संताज्ञा घेउनीया निज सदनिं मुदा जावयासी निघालों ।
देवी नाणी वणीची कथुनि कथुनि मी पाटला श्रांत झालों ।
हट्टानें आणिसी तूं जरि त्यजुनि वचा संतचूडामणीच्या ।
वाटे खोटी अपेक्षा करिसि हृदिं अती साउलीची फणीच्या॥११२

## शिखरिणी.

कावजीचें उत्तर.

गरीबांचा खोटा, धनिक मनुजांचा गुरु खरा ।
वदा कोठें आहे भुविं निगमें-प्रामाणिक-गिरा ॥
तुम्हा जैसा साई गमत मजला कीं मम गुरू ।
तयाज्ञेचा मीही खचितचि शके भंग न करूं ॥ ११३ ॥

---

१ आनंदानें. २ न आणी=आणूं नको. ३ थकलों. ४ सर्पाच्या ५ वेद ६ वचन.

## दिंडी

अहो अवधारा नवल कथा आतां । कावजीचा गुरु कोण कसा होता
नांव त्याचें हो मधुर देवराव । सदा छपवी जो अंतरिचे डाव॥ ११४॥

## स्रग्धरा.

येई प्रत्येक वर्षी अनुचर सदनीं याचना हो कराया ।
ग्रामा संनीध धामा जवळि मग कधीं मंडपा घालि राया ॥
पूजा होमादिकर्मे करित मग तिथें तीनशे रौप्य मुद्रा ।
घेऊनी द्वादशाब्दें सतत अशिजया पासुनी, घेत निद्रा ॥ ११५

## मंदाक्रांता.

जो, ना, दे, त्या, जरि अवतरे श्रीकपर्दी, कपर्दी ।
त्यानें गेहा गमन करुनी केलि कीं गर्द गर्दी ॥
आणायाला वणिहुनि तया देव रायासि भद्रा ।
बोवा देई त्वरितचि अहो चारशें रौप्य मुद्रा ॥ ११६ ॥

## दिंडी.

देवरावा ती वाटली सुभद्रा । झाली होती भंगुनी ती कुभद्रा ।
नेउनी ती स्वग्रामिं देवबापा । कावजीला मग पाठवी निरोपा॥ ११७

## आर्या.

(देवरायाचें मागणें व तें न दिल्यास शिक्षा.)

देशिल मज जरि बक्षिस अर्धी तव भूमि कावजी कोळ्या ।
तरि मी वणि मातेची प्राणप्रतिष्ठा करीन रे भोळ्या ॥ ११८ ॥

---

१ शिष्याच्या घरी. २ मंदीर. ३ बारावर्षे. ४ शंकर. ५ कवडी. ६ शुभकारी देवी. ७ रुपये. ८ उत्तम कल्याण कारी. ९ अशुभ.

नाहिं तरी तपयोगें घेउनि ती मी प्रसन्न रे करुनी ।
तव प्राणघात होईल घेइन ऐशा वरासि मागोनी ॥ ११९ ॥

## दिंडी

बावांचें बोल खरे झाले.

देवरावाच्या ग्रामिं मरी आली । जइं त्यांनें ती वणी देवि नेली ॥
प्लेग होउनि माणूस मरे फार । जीवहानी जाहली अनीवार ॥१२०॥

## भुजंगप्रयात

गुरूच्या निरोपें बुवा लाल झाला । जणूं दंशिलें पन्नगें काळजाला॥
गमे फाडिला कीं वृकें विग्रहासी।जणूं जाळिलें वन्हिनें तत्शिरासी ॥

## पृथ्वी

(कावजी मजकडे आला त्याचे गुरूबद्दलचे उद्गार.)

तसावि उठला बुवा मम गृहीं त्वरें पातला ।
म्हणे मम धनाद्रिकां लुटुनि दुष्ट हा मातला ॥
गुरू न, शठ हा खरा, विपुल दाम त्या अर्पिला ।
तरी खल दुरात्मनें मम गळा कि हो कापिला ॥ १२२ ॥

## भुजंगप्रयात

अहो दुष्टबुद्धि अशी ज्या नराला । कदां, देवि,दे,का,तया त्या वराला
तुम्ही दाद घ्या,मान घ्या मद्वचाला।करा शासना योग्य त्या दुर्जनाला ॥

१ अतिशय. २ लांडग्यानें ३ चौराला

## आर्या.

कावजीचे गुरूस शिक्षा करण्याबद्दलचे उद्गार.

अशुभ नको ती चंडा, शृंखल दंडेन बांधुनी दंडा ।
मुंडा काढा धिंडा फेका कुंडांत ढोंगि येरंडा ॥ १२४ ॥

## लावणी—

" जाउ नकोरे विषयाटविची "—या चालीवर.

( माझें कावजीस सांगणें. )

भोंदु गमे जरि निंदु नये गुरु शांति धरी रे मनीं । बुवारे शांति ॥धृ०
सुकाळ ऐशा जगति गुरूंचा, विरळ खरा रे जनीं ॥
चतुः सहस्रा मुद्रा खर्चुनी, लाभ काय कोपुनी ।
घेई बोधा, अशा गुरूंना येउं न दे सदनीं ॥ बुवारे ॥ १२५ ॥

## कामदा.

शांत जाहला कोळि अंतरी । पूर्व–प्रस्तरां स्थापि मंदिरीं ।
त्यांत परि दुजी देवी आणुनी । ठेवि साइश्री वचन मोडुनी ॥१२६॥

## स्वागता.

प्राणसंकट बुवावरि आलें । संकटें चिणुनि जर्जर केलें ।
त्यांतुनीहि असु वांचवि साई । दाउनी अशी अगाध नवाई॥१२७॥

---

१ देवी २ सांखळदंडानें ३ पाट काढा ( हजामत करा ) ४ पूर्वीचेच दगडधोंडे. ५ संकटांनी चेंपून गुदमरून गुरफटून. ६ प्राण

## स्त्रग्धरा

( बाबांस वंदन. )

८ ज्या श्रीकैलासकांता शिरिं नटुनि जी हीणवी श्रीउमेला ।
ज्या श्रीवैकुंठनाथांपदिं वसुनि जी शीणवी श्रीरमेला ॥
ज्या श्रीद्वारावतीपानन जनित जी लाजवी वेदमाई ।
त्या श्री गंगे धरी जो शिरिं पदिं वदनीं वंदि त्या दत्त साई ॥१२८॥

## स्त्रग्धरा.

( बालाची प्रार्थना. )

कोणी मागें धरा स्त्री, धन, सुत, गति, जें त्यासि तें देइ देवा ।
बाला दे नित्य सेवा तवचरणिं रती॰ नान्य हा गोड मेवा ।
तूं त्याची माय साई जननि गियशिवा पांडुरंगे विठाई ।
गोडा लाचावलेला पुनरपि विनवी भक्ति दे त्या मिठाई ॥ १२९ ॥

---

१ सगरानें स्वर्गांतून आणलेल्या गंगेचा वेग कोणीही सहन करूं शकेना म्हणून कैलासनाथ श्री शंकरानें तिला आपल्या शिरावर जटेंत धारण केली त्यामुळें ती श्री पार्वतीमातेला सवत होऊन हिणऊं लागली. २ तीच गंगा श्री विष्णुच्या पदकमलीं उत्पन्न होवून श्री लक्ष्मीदेवीची सवत बनल्यामुळें श्री रमामाईला जी नित्य त्रास देते. ३ त्याचप्रमाणें श्री द्वारकाधीश श्रीकृष्ण परमात्म्याचे मुखांत उत्पन्न होऊन जिनें वेदमातेला खालीं पाहावयास लावलें. ( चार वेदांचा अधिकार फक्त दोन वर्णांनाच आहे. स्त्रिया व शूद्रादिकांस नाहीं ही उणीव भरून काढण्याकरितां श्री भगवद्गीतेचा अवतार झाला म्हणजे गीता ऐकण्याचा अधिकार स्त्री-शूद्रासही आहे. (४) “श्रीज्ञानेश्वरी अ० १८ श्लो० ६६ वरील ओव्यांपैकीं १४२६ पासून १४६६ पर्यंतच्या ओव्यांपैकीं पहा.” ५ जमीन ६ मोक्ष, ७ आवड ८ दुसरे नको

## पंचचामर.

(पुनरपि वंदन.)

किरीट कुंडालन्वितं, कुबुद्धि कंस कंदनम् ।
निरंजनं निरामयं च, नंदनंदनंदनम् ॥
चिदार्णवं चिदीश्वरं त्रि-तापनाशि चंदनम् ।
मदीयमस्तु साइनाथ, त्वां सदैव वंदनम् ॥ १३० ॥

अर्थः—हे साइनाथा, किरीटकुंडलांनीं युक्त, दुष्ट कंसाला मारणारे आणि अज्ञानातीत अथवा शाठ्यरहित निरोगी अथवा दोषातीत, नंद राजाला आनंद देणारे त्याचे तनय श्री कृष्ण परमात्माच, तसेंच ज्ञानसागर, ज्ञानेश्वर व त्रिविध- आधिभौतिक-आधिदैविक-व आध्यात्मिक—तापांचें नाशन करणारे चंदनच असे जे आपण त्या आपणाला माझा अखंड नमस्कार असो.

## आर्या.

(पुनरपि प्रार्थना).

तव पत्प्रेरणया या ग्रथिता वाक्सुमनस्त्रग्मया कंठे ।
स्वीकुरु समर्पये तां दत्त गुरो बाल याचनेति मुदा ॥ १३१ ॥

अर्थः—हे दत्तगुरो आपल्या पायाच्या स्फूर्तीनें जी ही मी वाचारूपी कुसुमांची माला तयार केली आहे ती आपल्या कंठांत घाल्तों, तिचा आनंदानें स्वीकार करावा अशी (अज्ञ) बाळाची प्रार्थना आहे.

ठाणे १४।४।२६.

बाबांचें बाळ.

श्री.

## ॥ साईनाथ प्रसन्न. ॥

रा. रा. रामचंद्र आत्माराम तर्खड यांसी दिनकर वासुदेव जोशी ड्रॉईंग टीचर यांचा सप्रेम साष्टांग नमस्कार वि. विशेष. मी आपणाकडे माझे साईनाथासंबंधीं स्वतःचे अनुभव व आमच्यामुळें दुसऱ्यास झालेले अनुभव व साईनाथ कृपेनें स्फूर्ति होऊन स्वप्नावस्थेंतील त्यांच्या प्रत्यक्ष आज्ञेनें केलेली स्वानुभवाचीं पद्यें व आरती आपणाकडे पाठवित आहें. तरी आपल्या श्री साईलीलेच्या अंकामध्यें तीं, त्यांतील शुद्धाशुद्ध सुधारून प्रसिद्ध करण्याची तज्वीज होईल तर मजवर आपले अनंत उपकार होतील. तरी माझ्या विनंतीला मान देऊन आपल्या अंकामध्यें त्यांस स्थळ द्याल अशी आशा आहे.

माझे स्वतःचे अनुभवः—मी स्वतः एक नास्तिक होतों. परंतु माझें मागणें नेहमी असें असे कीं मला साईनाथ प्रत्यक्ष दर्शन देऊन एखादा अनुभव दाखवितील तर मी त्यांना अनन्यभावें शरण जाऊन त्यांचे पदीं लीन होईन. त्याप्रमाणें मुक्काम बिलीमोरा येथें टाटा हायस्कूलमध्यें आज २॥ वर्षें झालीं मी नोकरी करीत आहें. एकंदर माझी नोकरी १९ वर्षांची पेन्शनेबल झाली परंतु असे सिद्ध पुरुष व अशी जागृत मूर्ति माझ्या ऐकिवांत रा. रा. बी. एन्. फडकर यांच्या सहवासानें आली व तिनें मला स्वप्नांत दर्शनही दिलें आणि त्याप्रमाणें घटकोघटकीं अनुभव येत आहेत. एकदां आमची धाकटी मुलगी चि. नर्मदाबाई गर्मीच्या व्रणामुळें अतिशय आजारी होऊन अगदीं मृत्युपंथास लागली होती. ( त्यावेळेस फडकर ह्यांच्या कडून साईनाथांचा फोटो आमच्याकडे पेंटिंग एन्लॉर्जमेन्ट करितां आलेला होता व त्या रूपानें श्री साईनाथांनीं आमच्या घरीं वास्तव्य केलें तें अजून कायम असून आम्हांस प्रत्यक्ष अनुभव देऊन आपल्या पदीं लीन करून ठेविलें. ) तेव्हां श्री साईनाथ हे आमच्या कुटुंबाच्या पाहाटे ५ वाजतां स्वप्नांत येऊन फडकरांच्या मुलीस सांगूं लागले कीं “ बेबी आम्ही तुमच्यामुळें त्यांच्या घरीं वास्तव्य केलें व

त्यांची मुलगी फार दुःखी होत आहे तरी त्यांच्या घरीं जाऊन तूं त्यांस हा नारळ नेऊन दे व सांग कीं घाबरण्याचें कारण नाहीं. " या स्वप्नाप्रमाणें दोन दिवसांत मुलगी हुशार झाली व सर्व रोगपरिहार होऊन ती आतां चांगल्या स्थितींत आहे.

अनुभव दुसराः—आम्ही दर गुरुवारीं व एकादशी अगर मनास वाटेल त्या दिवशीं श्री साईनाथांची आरती व मी केलेलीं पद्यें वगैरे म्हणत असतों. त्यावेळीं आमच्या शेजारीं एक पोस्टांतील चिमणलाल म्हणून क्लार्क राहातात, त्यांचें कुटुंब ( नामें निर्मळ ) आरतीच्या वेळीं नेहमी येई व म्हणे कीं साईनाथ मला प्रत्यक्ष दर्शन देतील तर मी त्यांची मनापासून भक्ति करीन व त्यांनीं आम्हांस संकटांतून मुक्त करावें ( त्यांच्यावर कांहीं पोस्टांत चोरी होऊन आफत येऊन त्यांच्या पगारांतून पैसे कापिले जात होते ते बंद व्हावे ). त्याप्रमाणें श्री साईनाथ हे तिसऱ्या दिवशीं तिच्या स्वप्नांत जाऊन तिला म्हणतात कीं मी साईनाथ आलों आहें, तरी मला भिक्षा घाल, तेव्हां तिनें त्यांना सांगितलें कीं तुम्ही फोटो मधील साईनाथ नाहीं. तेव्हां त्यांनीं सांगितलें कीं जा. फोटो पाहून ये, त्याप्रमाणें तिनें फोटो पाहिला तो अगदीं बरोबर तसा दिसला, व पुढें तिच्या नवऱ्याचे पैसे कापणें बंद झालें. ह्या प्रमाणें दुसरे लहान लहान अनुभव पुष्कळ आहेत पण वेळेच्या अभावामुळें लिहूं शकत नाहीं. पुढें एखादे वेळीं पदें व बाकी अनुभव देऊं.

पद. ( राग काफी ताल दिपचंदी )

देई प्रभो सौख्याला । विनती आमुची । तव पद कमला ।। साई ।।धृ०।।
मम गृहामति येऊनी बैससी । कुतर्क अमुचे तूं घालविशी ।। साशंकित मन उज्वल करूनि । त्वंन्नामीं रत आम्हां करिसी ।। साई ।। ।। १ ।।
सुमार्ग दाऊनि प्रभु भक्तीसी । दृष्टांता देऊनि तूं लाविसि ।। नास्तिकातें आस्तिक करिसी । ऐशी तुझी अपरिमित शक्ति ।। साई ।। २ ।।
संकट पडतां तव भक्तासीं । वेगें धाउनि तूं रे येसी ।। कठिण प्रसंगीं तूं

सोडविशी । ऐशी माया तूं दाविसी ॥ साई ॥ ३ ॥ लीला दाऊनि तव पदासीं । नत हो आम्हा तूं रे करिसी ॥ ऐशी तूझी विलक्षण शक्ति । आली त्याची आम्हां प्रचिति ॥ साई ॥ ४ ॥ चिरसौख्यातें देई आम्हासी । वरदहस्त असो ही मम विनति ॥ बालक दिनकर तव कवनासी । करि हो त्यासी देई सुबुद्धि ॥ साई देई प्रभो ॥५॥

**पद.** चालः—( जल थाडी रहु बनोमे चालुंगी तोरे सात )

गुरूराया आलों पाया दासा या उद्धरी । साईनाथा आलों पाया दासा या उद्धरीं ॥ भक्त काजा आलो पाया दासा या उद्धरीं । तव वरदहस्त सदा असो द्या मम शिरीं ॥ साई नाथा ॥धृ० ॥ भक्त-वत्सला दीन दयाळा । श्री साईनाथा ॥ ह्या दीनासी उद्धरण्याचा हेत मनीं आपुल्या ॥ साईनाथा उ. ॥ १ ॥ कवण्या मीषें मम गृहासी आगमन केलें । स्वस्थचित्तें मानस करूनि मद्वच परिसावें ॥साईनाथा॥ उ०२॥ नामें फडकर वसती ज्याची मोरा ग्रामीं होती । तया गृहाप्रति प्रतिमारूपें आपुली ह्यो वसती ॥ साईनाथा उ. ॥ ३ ॥ तयासि माझा परिचय होता काय मुखें वदती । ह्या व्यक्तीची अगम्य लीला साई नाथ म्हणती ॥ साईनाथा उ० ॥ ४ ॥ साईनाथाचे गुण किती वर्णू मति कुंठित झाली । एक्याकाळीं नास्तिक होतों भक्ति पदीं जडली ॥ साईनाथा उ० ॥ ५ ॥ मम निमित्तें तव गृहासीं आगमन झालें । स्वस्थ चित्तें भजतां त्यांसी देईल सौख्यातें ॥ साईनाथा उ. ॥ ६ ॥ तव कीर्ति हो ऐकुनि मातें स्फुर्ति मनी जाहली । निद्रावस्थे असतां माते तव मूर्ति दिसली ॥ साईनाथा उ० ॥ ७ ॥ दर्शन होतां मम चित्तासी शांति प्रभु जाहली । सौख्यानंदा मध्यें असतां गुप्तची हो जाहली ॥ साईनाथा उ० ॥ ८ ॥ अतर्क्य लीला दाऊनि त्वां हो मम मानस नेलें । तव पायाशीं आलों असतां सौख्या दावियलें ॥ साई-नाथा उद्धरीं ॥ ९ ॥

पद. चालः—( अजी ब्रह्म पाहिलें. )

आजी मूर्ति पाहिली । साईमूर्ति पाहिली ॥ वंदुनि तीतें सद्भावें मी मम हृदयीं ठेविली ॥ आजी मूर्ति०॥धृ०॥ ध्यान जयाचें उग्र दिसे जरी । परम कृपाळु दयाळु अंतरीं ॥ कपट नसे हो लेश मुळि जरी । माय माझी माऊली ॥ आजी मूर्ति०॥ १ ॥ उद्धरणारा दीन जनाला । शिरडी माजी प्रभु अवतरला ॥ लीला दाखवी भक्त जनांला ॥ हरिली मनें सकलांची ॥ आजी० ॥ २ ॥ एक लहानशा मृदु काष्ठासी॥ लटकावी हो प्रभु आढ्यासी । त्यावरि आरूढतां कृति कैसी ॥ कधीं न दिसे कवणासीं ॥ आजी० ॥ ३ ॥ दीपोत्सवाची हौस साईची । नित्य जाइ हा तैलासाठीं ॥ न मिळतां प्रभु करणी कैशी । करून दावी जनाप्रती ॥ आजी० ॥ ४ ॥ एके समयीं तैल न देती । प्रसन्न चित्ते येई मशीदी ॥ जला मिसळुनि त्या तैलाशीं । पिऊन गेला झडकरी ॥ आजी० ॥ ५ ॥ तैल पात्रीं भरूनि जलासीं । त्या जलानें दीपोत्सवकरिसी ॥ करूनि दावी अगाध कृतिसी । प्रभुविना कृति कशी ॥ आजी ०॥ ६ ॥ ऐशा लीला नित्य प्रभु तो । करुनि दावी पुरवी हेतो ॥ भजतां त्यासी पार नसे हो । सौख्याला तो कधीं ॥ आजी० ॥७॥ ज्यासी आहे त्यांची भक्ति । त्यासी देई त्वरित प्रचिती ॥ भक्तिभावें जो नर पूजी । त्यासी देई सद्गति ॥ ॥ आजी० ॥ ८ ॥ माझ्या मनिची आस अशी हो । सौख्यानंदा चिर सुख देवो ॥ उन्नति माते सुखकर होवो । प्रभु देई सन्मति ॥आजी०॥ ॥ ९ ॥ संकटीं पडतां भक्त शिरोमणी । धांवत येई माय जशी झणी॥ निमिष मात्रें मुक्त करोनि। चिर सुख हो दे अति ॥आजी० ॥१०॥ जो नर पूजी ज्या देवासीं । त्यासि दिसतसे मूर्ति तैशी ॥ मग लागे तो साई पायाशीं।अशी लीला दावी किती॥आजी मूर्ति पाहिली ॥११॥

**आरति.** जाल:-( आरति भुवन सुंदराची )

आरति साईनाथ गुरुची । करूंया आनंदें साची ॥ धृ०॥ जीला श्रुति शास्त्रें वर्णितातीं । ती हो मूर्ति ही साची ॥ जयाच्या अगाध हो लीला। तो प्रभु सर्वजगीं भरला ॥ तयाचा ठाव नसे कवणा । तयाचें ॥ उग्ररूप दिसे ॥ शांत मनी असे । अंत मुळीं नसे ॥ अणुरेण भरला । परि तो न दिसे कवणाला ॥आरति०॥ १ ॥ जो आहे निर्गुण निर्विकार । व्यापुनि सर्व चराचर ॥ ध्याइ जो त्यासी भक्तवर । ठेवि हो शिरीं अभयकर॥ तयाच्या अगम्य हो लीला॥ वर्णु मी किती ॥ नाहीं मम मती । श्रमलों बहु अती ॥ तोरी तारी मजसी । प्रभु रे तारी तारी मजसी ॥ आ० ॥ २ ॥ जयासी नाहीं जगीं उपमा । तयाच्या विभूतिचा महिमा ॥ माझी न वर्णू शके रसना । मार्गही भवाब्धि संतरणा ॥ पाहतां दिसे शुद्र हो जरी ॥ पाहता दिसे॥ देई मुठ भरी । गुण अंतरी । साईची धूरी ॥ दावीतसे जगतीं । अखेर ही सर्वांचीच गति ॥ आ० ॥ ३ ॥ अहो ती धन्य विभूति ज्याची । करितसे सार्थक देहासी ॥ जी मध्यें अपूर्व ती शक्ति । सेवितां विघ्नें दूर होती ॥ अशी ती धन्य जगीं राख ॥ अशी ती ॥ साधू संत सेविती । धन्य मानिती ॥ सार्थका करी॥ सर्वत्रा जगतीं । खरोखर सर्वत्रा ॥ आ०॥ ४ ॥ असे साई उद्धरण्या जगतीं । शिरडी माजी अवतरती ॥ आतां समाधिस्त मूर्ति । परि हो जागृत ते असती ॥ अशी ही मूर्ति तुम्ही जाणां ॥ अशी ही ॥ अनमान करूं नका । ठेवा पदीं माथा ॥ धावे भक्त सखा अवधि मुळी नाहीं । अहो तो करुणार्णव पाही ॥ आरती ॥ साईनाथ गुरुची । करूं या आनंदें साची ॥ ५ ॥

अंधेरी आक्टोबर १९२५

शके १८३२ सालांत माझें जुनें मोडकळीस आलेलें घर नवीन बांधण्यास सुरुवात केल्यामुळें भाऊबंदां मध्यें तंटे सुरु झाले व ते इतके विकोपास

जात असत कीं त्याचा मला रात्रंदिवस निजध्यास लागून त्यामुळें मी अक्कलकोटास श्री स्वामीचें पादुकांचे दर्शनास जाण्याचा बेत ठरविला. माझे मित्र रा. रा. रामचंद्र सीताराम यांनीं मला शिरडीहून अक्कलकोटास जाण्यास सुचविलें त्या प्रमाणें मी रात्रीच्या गाडीनें निघून सकाळीं कोपरगांवांत पोहोचलों. तेथें नदीच्या किनारीं पिंपळाचे पारावर ३।४ ब्राम्हण मंडळी बसली होती. त्यांनीं शिरडीस मुसलमाना कडेस कशाला जातां तो तुम्हांला काय देईल वगैरे निंदा केली. मी तेथील एका बैल गाडीनें शिरडीस निघालों. त्या दिवशीं नदीला पूर आला होता तेणें करून मला कंवरभर पाण्यांतून नदी पलीकडेस जावें लागलें व गाडींतील सर्व सामान व कपडे भिजून गेले. मी शिरडीस १०' चे सुमारास पोहचलों. तो दिवस गुरु पौर्णिमेचा असल्यामुळें तेथें नाना साहेब चांदोरकर व इतर मंडळी बाबांची श्रद्धायुक्त पूजा करीत होती. मी बाबांचे दर्शनास गेलों. इतर मंडळी पूजा वगैरे आटोपून गेल्यानंतर मी पूजा करण्यास सुरुवात केली तोंच त्यांनी "अरे सापाचे दांत पाडून घशांत घालावे तो दुष्ट किती उडया मारील तें आपणच पाहूं. काळजी कशाला करावी. आपण लोकांचें बरें करीत असावें मग देव आपलें बरें करितों" नंतर त्यांनी स्वतःचे हातांनें कपाळास व दोन्ही बाजूस अशा तीन ठिकाणी गंध, अक्षदा व फुलें लाऊन ब्रह्मा, विष्णु, महेश अशी तीन स्वरूपें आहेत असें करून दाखविलें. तेथें देशपांडे बसले होते त्यांनीं बाबा आज हें काय करून दाखवीत आहां असें विचारलें. अरे सहज जगांतील लीला करून दाखवितों. नंतर मला बाबांनीं वाडयांत जाण्यास सांगितलें. माझी तेथें कोणाचीही ओळख नव्हती तरी पण नानासाहेब चांदोरकरांनीं त्यांच्या स्वतःच्या मंडळीबरोबर माझी उत्तम प्रकारें व्यवस्था ठेवली त्या बद्दल त्यांचे जेवढे उपकार मानावे तेवढे थोडेच. नानासाहेबांसारख्या श्रीमंत व थोर पदवीला चढलेल्या मनुष्याचें नम्र, शांत व उदार अंतःकरण पाहून त्या वेळच्या प्रत्येक मनुष्यास त्यांच्याविषयीं पूज्यभावना उत्पन्न झाल्यावांचून राहत नसे.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं मी अक्कलकोटास जाण्याकरितां बाबांची आज्ञा घेण्याकरितां गेलों. त्यांनीं "दोन घास खाऊन जा, उपवासी जाऊं नये." असें सांगितलें. नंतर नानासाहेबांनीं माझी जेवणाची व्यवस्था केली. जेवण झाल्यानंतर आतां गाडी मिळणार नाहीं सबब मी संध्याकाळीं निघण्याचा विचार ठरविला, इतक्यांत बाबांनीं बोलावावयास पाठवून "आतांचे आतां जा येथें राहूं नकोस, दे,कांहीं दक्षणा दे," असें म्हटलें.मी दोन रुपये दक्षणा दिली.तेव्हां "अरे आणखी दोन दे, दोन देशील तर चार होतील, चार देशील तर आठ होतील; पेरशील तर उगवेल,पेरलेंच नाहीं तर उगवणार कोठून,"असें म्हणाले. मी आणखी दोन रुपये दक्षणा दिली; तेव्हां "जा तेरा अल्ला भला करेगा" असा आशिर्वाद दिला. नंतर मी ताबडतोब बैलगाडीनें कोपरगांव स्टेशनावर आलों. पाण्याच्या अतिवर्षावामुळें रेल्वेलाईन थोडीशी नादुरुस्त झाल्यामुळें गाडी नेहमीपेक्षां तीन तास उशिरां आली. तेणेंकरून मी त्या गाडीनें अक्कलकोटास गेलों व बाबांविषयीं मनांत आश्चर्य वाटलें. तेथें एक दिवस राहून मुंबईस येण्यास निघालों. स्टेशनावर आल्यावर माझ्याजवळ फक्त पुण्यापर्यंतचें टिकीट काढण्यापुरतेच पैसे शिल्लक होते. त्याप्रमाणें मी पुण्याचें टिकीट काढून गाडींत बसलों व पुणें गावांत जाऊन माझ्या एका मित्राकडून मुंबईस जाण्याकरितां पैसे उसने घेण्याचा विचार ठरला. गाडींत इकडच्या तिकडच्या गोष्टी बोलतांना पुण्यास उतरण्याचें कारण मी शेजारी बसलेल्या मंडळीस सांगितलें. त्यांत एक ब्राह्मण बसला होता. त्यांनीं सांगितलें कीं पुण्यास फारच प्लेग आहे व गांवांतील बरेच लोक बाहेर राहण्याकरितां गेले आहेत. आपण गांवांत जाऊं नये. मी तुम्हांला मुंबईचें टिकीट काढून देतों. नंतर माझे पैसे मॅनिआर्डरनें पाठवून द्यावे. त्यांनींच बाहेर जाऊन मला एक मुंबईचें टिकीट आणून दिलें व स्वतः चहा पिऊन येतों असें मला सांगून चहा पिण्याकरितां गेला. तेथें गाडी एक तास उभी राहत असे. अर्धा तास झाल्यानंतर मी त्या मनुष्याला सर्व प्लॅटफार्मवर व गाडींत शोधला परंतु तो मनुष्य कोठें बसला, कोठून आला व कोठें गेला त्याचा मला मुळींच पत्ता लागला नाहीं. मी घरीं आल्यावर एक वर्षाच्या आंत घराचें काम पुरें केलें. ज्या ज्या वेळेस मला घराचे कामांत अडचणी येत

असत त्या त्या वेळेस श्री साईबाबा त्या अडचणी दूर करीत असत. व दुसरी माझी घरांची कामें भयंकर अडचणी आल्या असतांही निर्विघ्नपणें आजपर्यंत पार पडली.

दुसऱ्या वर्षी मी शिरडीस गेलों. त्या वेळेस बाबांनीं मला एक दिवस जास्त ठेऊन घेतलें व निवृत्तेवेळेस प्रत्येकास १।२ असे पेरू वाटले. परंतु त्यांत मलाच फक्त पांच पेरू म्हणून प्रसाद दिला. वरिष्ठांची रजा न घेतां तसाच शिरडीस गेलों व एक दिवस बाबांनीं जास्त ठेऊन घेतलें, नोकरीवर गेल्यावर वरीष्ट माझ्यावर रागावतील अशी भीति मनांत उत्पन्न झाली होती; परंतु वरिष्टांनीं मला हांसत हांसत सांगितलें कीं आपल्या ड्रॉईंग डिपार्टमेन्टमध्यें तुम्हांलाच सर्वापेक्षां पांच रुपये जास्त प्रमोशन एजन्टसाहेबांनीं दिलें आहे. हें ऐकून बाबांची पांच पेरूंचे प्रसादाची खूण पटली.

समर्थांचा दास

**श्रीकृष्ण पुरुषोत्तम पाटील.**

# अध्याय ३९ वा.

श्रीगणेशाय नमः । श्रीसरस्वत्यै नमः । श्रीगुरुभ्यो नमः ।
श्रीकुलदेवतायै नमः । श्रीसीतारामचंद्राभ्यां नमः ।
॥ श्रीसद्गुरूसाइनाथाय नमः ॥

धन्य धन्य शिरडी स्थान । धन्य द्वारकामाईभुवन ॥
जेथें श्रीसाई पुण्यपावन । आनिर्वाण वावरले ॥ १ ॥
धन्य धन्य शिरडीचे जन । जयालागीं इतक्या लांबून ॥
जेणें कवण्याही निमित्तें येऊन । ऋणी करून ठेविलें ॥ २ ॥
गांव शिरडी आधीं लहान । साई सहवासें झाला महान ॥
त्याचेनि झाला अति पावन । त्याचेनि तीर्थपण तयाला ॥ ३ ॥
त्या शिरडीच्या बायाही धन्य । धन्य त्यांची श्रद्धा अनन्य ॥
न्हातां दळतां कांडितां धान्य । गाती असामान्य साईतें ॥ ४ ॥
धन्य धन्य तयांचें प्रेम । गीतें गाती अत्युत्तम ॥
ऐकतां तयांतील कांहीं अनुत्तम । होतसे उपरम मनास ॥ ५ ॥
म्हणोनियां श्रोतयांप्रती । यथाकाळें कथानुसंगती ॥
व्हावया तयांची जिज्ञासातृप्ती । देईन विश्रांतीदायक तीं ॥ ६ ॥
साई निजामशाहींत प्रकट । आत्ततळीं मार्गानिकट ॥
धूपखेड्याचे वऱ्हाडासकट । शिर्डीस अवचट पातले ॥ ७ ॥

---

१ आपली मशीद ही द्वारकामाई आहे असें श्रीसाईबाबा पुष्कळ वेळां म्हणत.

या खेड्यांतील पुण्यवान। चांद पाटील नामाभिधान॥
तया आरंभीं जडलें हें निधान। इतरां दर्शन त्याचेनी॥ ८॥

कैसी तयाची घोडी हरवली। कैसी साईची गांठीं पडली॥
कैसी तयांनी चिलिम पाजिली। घोडी त्या दिधली मिळवून॥ ९॥

चांदभाईचे कुटुंबाचा। भाचा एक होता लग्नाचा॥
वधूचा योग जुळला शिरडीचा। वऱ्हाड वधूच्या गांवीं ये॥ १०॥

ये विषयींची साद्यंत कथा। पूर्वींच कथिलीसे श्रोतयांकरितां॥
तथापि स्मरली प्रसंगोपात्तता। नको पुनरुक्तता ज्याची॥ ११॥

चांद पाटील केवळ निमित्त। भक्तोद्धाराची चिंता अत्यंत॥
म्हणोनि साई हा अवतार धरित। स्वयेंच कीं येत शिरडींत॥१२॥

जड मूढ हीनदीन। व्रततपसंस्कार विहीन॥
साळेभोळे भावार्थी जन। कोण साईवीण उद्धरिता॥ १३॥

अष्टादश वर्षांचें वय। तेथून एकांताची संवय॥
रात्रीं कुठेंही पडावें निर्भय। सर्वत्र ईश्वरमय ज्यासी॥ १४॥

होता जेथें पूर्वीं खड्डा। अवघ्या गांवाचा जो उकिरडा॥
दिवसा फिरावें चहूंकडा। रात्रीं पहुडावें ते स्थानीं॥ १५॥

ऐसीं गेलीं वर्षें बहुसाल। आला खड्ड्याचा उदयकाळ॥
उठला सभोंती वाडा विशाळ। या दीनदयाळ साईचा॥ १६॥

अंती त्याच खड्ड्याचा गाभारा। झाला विसावा साई शरीरा॥
तेथेंच त्यांना अक्षय थारा। झाला उभारा समाधीचा॥ १७॥

तोच प्रणतवत्सल साईसमर्थ। दुस्तर भवार्णव संतरणार्थ॥
ही निज चरित्र नौका यथार्थ। भक्तजन हितार्थ निर्मीतसे॥ १८॥

कीं ही भवनदी महा दुस्तर। अंधपंगू हा भक्तपरिवार॥
तयालागीं कळवळा फार। पावेल पैल पार कसेनी॥ १९॥

सर्वां आवश्यक भवतरण । तदर्थ व्हावें शुद्धांतःकरण ॥
चित्तशुद्धि मुख्य साधन । भक्तसज्जन त्या मूळ ॥ २० ॥

श्रवणासारिखी नाहीं भक्ति । श्रवणें सहज गुरुपदासक्ति ॥
उपजे निर्मळ शुद्ध मती । जेथून उत्पत्ती परमार्था ॥ २१ ॥

या साईच्या अगणित कथा । गातां गातां होईल गाथा ॥
तरी ही संकलित वानूं जातां । नावरे विस्तृतता अनावर ॥ २२ ॥

जों जों श्रोतयांश्रवणीं चाड । तों तों वाढे निवेदनीं आवड ॥
पुरवूनि घेऊं परस्पर कोड । साधूं कीं जोड निजहिताची ॥ २३ ॥

साईच येथील कर्णधार । दृढ अवधान हाचि उतार ॥
कथाश्रवणीं श्रद्धा आदर । त्या पैलपार अविलंबें ॥ २४ ॥

गताध्यायीं निरूपण । जाहलें संक्षेपें हुंडीचें वर्णन ॥
दत्तभक्ति दृढीकरण । भक्तसंतर्पण नैवेद्यें ॥ २५ ॥

प्रत्येक अध्याय संपवितांना । पुढील अध्याय विषयसूचना ॥
होत गेली ऐसी रचना । समस्तांना अवगत हें ॥ २६ ॥

परी संपतां गताध्याय । नव्हती पुढील कथेची सोय ॥
साई आठवूनि देतील जो विषय । तोचि कीं आख्येय होईल ॥ २७ ॥
ऐसें जे होतें स्पष्ट कथिलें । तैसेंच साईकृपें जें आठविलें[1] ॥
तेंचि कीं श्रोतयांलागीं वहिलें । सादर केलें ये ठायीं ॥ २८ ॥

तरी आतां श्रोतयां प्रार्थना । दूर सारूनियां व्यवधाना ॥
शांत चित्तें द्या अवधाना । होईल मना आनंद ॥ २९ ॥
एकदां चांदोरकर सद्भक्त । बैसूनियां मशीदींत ॥
असतां चरणसंवाहन करीत । गीताही गुणगुणत मुखानें ॥ ३० ॥
भगवद्गीता चतुर्थाध्याय । जिव्हेस लावून दिधला व्यवसाय ॥
हस्तें चेपीत साईचे पाय । पहा नवल काय वर्तलें ॥ ३१ ॥

१ आठवण.

भूतभविष्य वर्तमान । साईसमर्था सर्व ज्ञान ॥
नानांस गीतार्थ समजावून । द्यावा हें मन जाहलें ॥ ३२ ॥

ज्ञानकर्म संन्यासन । ब्रह्मार्पण योगाध्यायाचें पठण ॥
नानाची ती अस्पष्ट गुणगुण । केली कीं कारण प्रश्नास ॥ ३३ ॥

"सर्वं[१]कर्माखिलं पार्थ" । होय ज्ञानीं परिसमाप्त[२] ॥
संपतां हा त्रयस्त्रिंशत[३] । 'तद्विद्धि[४] प्रणिपात' चालला ॥ ३४ ॥

हा जो श्लोक चवतिसावा । येथेंच पाठास आला विसावा ॥
बावांच्या चित्तीं प्रश्न पुसावा । निजबोध ठसावा नानांस ॥ ३५ ॥

म्हणती नाना काय गुणगुणसी । म्हणरे स्पष्ट हळू जें म्हणसी ॥
येवूंदे कीं ऐकूं मजसीं । पुटपुटसी जें गाळांत ॥ ३६ ॥

म्हण म्हणतां आज्ञाप्रमाण । श्लोक म्हटला चारी चरण ॥
बाबा पुसती अर्थनिवेदन । स्पष्टीकरणपूर्वक ॥ ३७ ॥

तंव ते नाना अतिविनीत । बद्धांजुली होऊनि मुदित ॥
मधुर वचनें प्रत्यूत्तर देत । वदत भगवंत मनोगत ॥ ३८ ॥

आतां हा सांईनाना संवाद । व्हावया सर्वत्रांना विशद ॥
मूळ श्लोक पदप्रपद । करूं कीं उद्धृत गीतेंतुनी ॥ ३९ ॥

कळावया प्रश्नाचें वर्म । तैसेच संताचे मनोधर्म ॥
करावा वाटे ऐसा उपक्रम । जेणें ये निर्भ्रम अर्थ हाता ॥ ४० ॥

आधीं गीर्वाण भाषा दुर्गम । साईस कैसी झाली सुगम ॥
आश्चर्य करती प्रश्न सवर्म । ज्ञान हें अगम्य संतांचें ॥ ४१ ॥

---

१ भग.गी. अ. ४ था. २ सर्वकर्मांची परिसमाप्ति ज्ञानांत होते. ३ भ. गी. श्लोक ३३ वा. ४ ज्याच्या आरंभीं 'तद्विद्धिप्रणिपातेन' असें आहे त्या श्लोकाचें पठण सुरू झालें. ५ श्रीसाई बाबा व कै. वा. नानासाहेब चांदोरकर यांचा. ६ स्पष्ट. ७ उतारा घेऊं. ८ स्पष्ट.

कधीं अध्ययन केलें संस्कृता । कधीं नकळे वाचिली गीता ॥
कीं तो गीतार्थहृद्गतज्ञाता । तैसा हो करिता प्रश्नातें ॥ ४२ ॥
श्रोतयांचिया समाधाना । व्हावी मूळ श्लोकाची कल्पना ॥
म्हणोनि अक्षरशः भगवंतवचना । वदतों जें विवेचना साह्यभूत ॥४३॥

"तद्विद्धिप्रणिपातेन । परिप्रश्नेन सेवया ॥
उपदेक्ष्यंति तेऽज्ञानं । ज्ञानिनस्तत्त्वदर्शिनः ॥ ४४ ॥

भ. गी. अ. ४ श्लो. ३४ वा.

हा तो गीतेचा मूळश्लोक । भाष्यानुसार अर्थ देख ॥
टीकाकारही झाले अनेक । ते एकवाक्यात्मक समस्त ॥ ४५ ॥
नानाही मोठे बहुश्रुत । गीताभाष्यपारंगत ॥
करूं लागती पदपदार्थ । यथा विदित श्लोकार्थ ॥ ४६ ॥
रसपूरित मधुरवाणी । नाना सविनय नम्रपणीं ॥
अन्वयअर्थ आणूनि ध्यानीं । अर्थ निवेदनीं सादर ॥ ४७ ॥
म्हणती गुरुपदीं प्रणिपात । गुरुसेवेसीं विकी जो जीवित ॥
प्रश्नादिकीं आदरवंत । ज्ञानी त्या ज्ञानार्थ उपदेशिती ॥ ४८ ॥
सारांष कृष्ण कृपामूर्ती । अर्जुना जें प्रेमें वदती ॥
गुरुसेवा गुरुप्रणती । ज्ञान संवित्ती दायक ही ॥ ४९ ॥
अर्जुना एणें मार्गें जातां । तत्त्वदर्शीज्ञानी तुज करितां ॥
दावितील ज्ञानाचा रस्ता । बाबा या अर्था मी जाणें ॥ ५० ॥
शांकरभाष्य आनंदगिरी । शंकरानंदी व्याख्या श्रीधरी ॥
मधुसूदन नीलकंठाधारीं । उपदेश परीही देवाची ॥ ५१ ॥
प्रथम दोन चरणांचा अर्थ । मान्य करिती साई समर्थ ॥
परी उत्तर श्लोकार्धमथित । साई जें कथित तें परिसा ॥ ५२ ॥

इतरही भक्त चकोरगण । साई मुखचंद्र अनुलक्षून ॥
करावया अमृतकण सेवन । आ पसरूनि आस्थित ॥ ५३ ॥
म्हणती नाना त्रितीय चरण । पुनश्च लक्ष्यांत घेई पूर्ण ॥
ज्ञान शब्दा मागील जाण । अवग्रह आण अर्थास ॥ ५४ ॥
हें मी काय वदें विपरीत । अर्थाचा काय करितों अनर्थ ॥
असत्य काय पूर्वील भाष्यार्थ । ऐसेंही निरर्थना मानी ॥ ५५ ॥
ज्ञानी आणि तत्वदर्शी । ज्ञान उपदेशीती ऐसें जें म्हणसी ॥
तेथें अज्ञान पद जैं घेसी । यथार्थ घेसील प्रबोध ॥ ५६ ॥
ज्ञान नव्हे बोलाचा विषय । कैसें होईल तें उपदेश्य ॥
म्हणोनि ज्ञान शब्दाचा विपर्यय । करी मग प्रत्यय अनुभवी ॥ ५७ ॥
परिसिला तुझा ज्ञान पदार्थ । अज्ञान घेतां कायरे वेंचत ॥
'अज्ञान' वाणीचा विषय होत । ज्ञान हें शब्दातीत स्वयें ॥ ५८ ॥
वार वेष्टी गर्भासीं । अथवा मल आदर्शासी ॥
विभूति आच्छादी वन्हीसीं । तैसेंच ज्ञानासीं अज्ञान ॥ ५९ ॥
अज्ञानानें आवृत ज्ञान । केलें या गीतीं[1] भगवंतें कथन ॥
एतदर्थ होतां अज्ञान निरसन । स्वभावें ज्ञान प्रकाशे ॥ ६० ॥
ज्ञान हें तो स्वतः सिद्ध । शैवालावृत तोयसें शुद्ध ॥
हें शैवाल[2] जो सारील प्रबुद्ध । तो जल विशुद्ध लाधेल ॥ ६१ ॥
जैसें चंद्र सूर्याचें ग्रहण । ते तो सर्वदा प्रकाशमान ॥
राहू केतू आड येऊन । आमुचे नयन अवरोधिति ॥ ६२ ॥
चंद्र सूर्यांना ही बाध । हा तो अमुचे दृष्टीस अवरोध ॥
तैसें ज्ञान असे निर्बाध । स्वयंसिद्ध स्वस्थानीं ॥ ६३ ॥

१ भगवद्गीतेंत. २ शेवाळी.

डोळा करी अवलोकन । तयाची देखणी शक्ती तें ज्ञान ॥
वरी पडळ वाढे तें अज्ञान । तयाचें निरसन आवश्यक ॥ ६४ ॥
तें पडळ अथवा सारा । हस्तकौशल्यें दूर सारा ॥
देखणी शक्ति प्रकट करा । अज्ञान तिमिरा झाडोनी ॥ ६५ ॥
पहा हें सकल दृश्य जात । अनिर्वचनीय माया विजृंभित ॥
हीच अनादि अविद्या अव्यक्त । अज्ञान विलसित तें हेंच ॥ ६६ ॥
ज्ञान ही वस्तू जाणावयाची । नव्हे ती विषय उपदेशाची ॥
प्रणिपात परिप्रश्न सेवा हींची । गुरुकृपेचीं साधनें ॥ ६७ ॥
विश्वाचें सत्यत्व महा भ्रम । हेंचि ज्ञानावरण तम ॥
निरसूनि जावें लागे प्रथम । प्रज्ञान ब्रह्म प्रकटे तैं ॥ ६८ ॥
संसार बीज जें अज्ञान । डोळां पडतां गुरुकृपांजन ॥
उडे मायेचें आवरण । उरे तें ज्ञान स्वाभाविक ॥ ६९ ॥
ज्ञान हें तो नव्हे साध्य । तें तों आधींच स्वयंसिद्ध ॥
हें तो आगमनिगम प्रसिद्ध । अज्ञान हा विरोध ज्ञानाला ॥ ७० ॥
देवां भक्तां जें भिन्नपण । हेंच मूळ अज्ञान विलक्षण ॥
तया अज्ञानाचें निरसन । होतांच पूर्ण ज्ञान उरे ॥ ७१ ॥
दोरा पोटीं सर्पाजनन । हें तो शुद्धस्वरूपाज्ञान[1] ॥
स्वरूपोपदेशें निरसे अज्ञान । उरे तें ज्ञान दोराचें ॥ ७२ ॥
पोटीं सुवर्ण वरी काट । काटापोटीं लखलखाट ॥
परी तो व्हावयालागीं प्रकट । हव्यवाटचि[2] आवश्यक ॥ ७३ ॥
माया मूळ देह जनन । अदृष्टाधीन देहाचें चलन ॥
द्वंद्वें सर्व अदृष्टाधीन । देहाभिमान अज्ञान ॥ ७४ ॥
म्हणोनि जे स्वयें निरभिमान । तयां न सुखदुःखाचें भान ॥
विरे जैं अहंकाराचें स्फुरण । तैंच अज्ञान निरास ॥ ७५ ॥

१ शुद्ध स्वरूपाचें अज्ञान. २ अग्नि.

स्वस्वरूपाचें अज्ञान । तेंच मायेचें जन्मस्थान ॥
होतां गुरुकृपा माया निरसन । स्वरूपज्ञान स्वभावें ॥ ७६ ॥
एका भगवद्भक्तीवीण । किमर्थ इतर साधनीं शीण ॥
ब्रम्हदेवही माये अधीन । भक्तीच सोडवण तयाही ॥ ७७ ॥
हो का ब्रम्हसदनप्राप्ति । भक्ती वांचून नाहीं मुक्ति ॥
तेथेंहि चुकल्या भगवद्भक्ति । पडे तो पुनरावृत्तींत ॥ ७८ ॥
तरी व्हावया माया निरसन । उपाय एक भगवद्भजन ॥
भगवद्भक्ता नाहीं पतन । भवबंधनही नाहीं तया ॥ ७९ ॥
जन म्हणती माया लटकी । परी ती आहे महा चेटकी ॥
ज्ञानियां फसवी घटकोघटकीं । भक्त नाचविती चुटकीवरी ॥ ८० ॥
जेथें ठकती ज्ञानसंपन्न । तेथें टिकती भाविकजन ॥
कीं ते नित्य हरिचरणीं प्रपन्न । ज्ञानाभिमानधन ज्ञानी ॥ ८१ ॥
म्हणोनि व्हावया मायातरण । धरावे एक सद्गुरूचरण ॥
रिघावें तया अनन्य शरण । भवभयहरण तात्काळ ॥ ८२ ॥
अवश्य येणार येवो मरण । परी न हरीचें पडो विस्मरण ॥
इंद्रियीं आश्रमवर्णाचरण । चित्तें हरिचरण चिंतावे ॥ ८३ ॥
रथ जैसा जुंपल्या हयीं । तैसेंच हें शरीर इंद्रियीं ॥
मनाच्या दृढ प्रंग्रहीं[1] । बुद्धी निग्रही निजहस्तें ॥ ८४ ॥
मनसंकल्प विकल्प भरीं । धांवे यथेष्ट स्वेच्छाविहारी ॥
बुद्धि त्या निज निश्चयें निवारी । लगाम आवरी निजसत्ता ॥ ८५ ॥
बुद्धिसारिखा कुशल नेता । ऐसा सारथी रथीं असतां ॥
रथस्वामीसी काय चिंता । स्वस्थ चित्ता व्यवहरे ॥ ८६ ॥
देहगत सकल कार्य । हें बुद्धीचें निजकर्तव्य ॥
ऐसी मनासी लागतां संवय । सर्व व्यवसाय हितमय ॥ ८७ ॥

---

१ लगामीं.

शब्दस्पर्श रूपादि विषय । येणें मार्गें लागल्या इंद्रिय ॥
होईल व्यर्थ शक्तिक्षय । पतन भय पदोपदीं ॥ ८८ ॥
शब्दस्पर्श रूपादिक । पंच विषयीं जें जें सुख ॥
तें तें अंतीं सकळ असुख । परम दुःख अज्ञान ॥ ८९ ॥
शब्दविषया भुले हरीण । अंतीं वेंची अपुला प्राण ॥
स्पर्शविषया सेवी वारण । साहे आकर्षण अंकुशें ॥ ९० ॥
रूपविषया भुले पतंग । जाळूनि निमे अपुलें अंग ॥
मीन भोगी रसविषयभोग । मुके सवेग प्राणास ॥ ९१ ॥
गंधालागीं होऊनि गुंग । कमलकोशीं पडे भृंग ॥
एकेका पायीं इतुका प्रसंग । पांचाचा संघ भयंकर ॥ ९२ ॥
ही तो स्थावर जलचर पंखी । ययांची दुस्थिती देखोदेखी ॥
ज्ञातें मानवही विषयोन्मुखी । अज्ञान आणखी तें काय ॥ ९३ ॥
अज्ञान नाशे विषयविमुख । होतां होईल उन्मनी हरिख ॥
जीव ज्ञानस्वरूपोन्मुख । आत्यंतिक सुख लाधेल ॥ ९४ ॥
चित्तें करा हरिगुरु चिंतन । श्रवणें करा चरित्र श्रवण ॥
मनें करा ध्यानानुसंधान । नामस्मरण जिव्हेनें ॥ ९५ ॥
चरणीं हरिगुरुग्रामागमन । घ्राणीं तन्निर्माल्याघ्राणन ॥
हस्तीं वंदा तयाचे चरण । डोळां घ्या दर्शन तयाचें ॥ ९६ ॥
ऐशा या सकल इंद्रियवृत्ति । तयां कारणें लावितां प्रीति ॥
धन्य तया भक्तांची स्थिति । भगवद्भक्ति काय दुजी ॥ ९७ ॥
सारांश समूळ अज्ञान खाणा । उरे तें ज्ञान सिद्ध जाणा ॥
ऐसें या श्लोकाचें हृद्गत अर्जुना । श्रीकृष्णराणा सूचवी ॥ ९८ ॥
आधींच नाना विनयसंपन्न । परिसूनि गोड हें निरूपण ॥
पायीं घालूनि लोटांगण । वंदिले चरण दो हातीं ॥ ९९ ॥

मग ते श्रद्धानिष्ठ प्रार्थना । करिती दवडा मम अज्ञाना ॥
दंडा माझिया दुरभिमाना । यथार्थ शासना करोनी ॥ १०० ॥
सात्त्विकतेची हौस वरवरी । विकल्प अखंड दाटे अंतरीं ॥
अपमान साहेना क्षणभरी । अज्ञान तें तरी काय दुजें ॥ १०१ ॥
पोटीं प्रतिष्ठेची उजरी । ध्यानाविर्भाव दावीं वरी ॥
कामक्रोध धुमसे भीतरीं । अज्ञान तें तरी काय दुजें ॥ १०२ ॥
आंतूनि सकळ कर्मं नष्ट । बाहेर मिरवूं ब्रह्मनिष्ठ ॥
आचारहीन विचारभ्रष्ट । अज्ञान स्पष्ट काय दुजें ॥ १०३ ॥
बाबा आपण कृपाघन । करोनियां कृपाजल सिंचन ॥
करा हा अज्ञानदावानल शमन । होईन मी धन्य इतुकेनी ॥ १०४॥
नलगे मज ज्ञानाची गोठी । निरसा माझीया अज्ञान कोटी ॥
ठेवा मजवरी कृपादृष्टी । सुख संतुष्टी तेंचि मज ॥ १०५ ॥
साई सप्रेम करुणाघन । नानास निमित्ता पुढें करून ॥
तुम्हा आम्हा सकलां लागून । गीतार्थप्रवचन हें केलें ॥ १०६ ॥
गीता भगवंताचें वचन । म्हणोनि हें प्रत्यक्ष शास्त्र जाण ॥
कालत्रयींही याचें प्रमाण । कधींही अवगणन होतां नये ॥ १०७ ॥
परी अत्यंत विषयासक्त । अथवा जो खरा जीवन्मुक्त ॥
या दोघांसीही नलगे शास्त्रार्थ । मुमुक्षू प्रीत्यर्थ या जन्म ॥ १०८ ॥
विषयपाशीं दृढ आकळिला । कधीं पावेन मी मुक्तेला ॥
ऐसें वदतिया मुमुक्षूला । तारावयाला हीं शास्त्रें ॥ १०९ ॥
पाहूनि ऐशा निज भक्तांला । संतास जेव्हां येतो कळवळा ॥
काढूनि कांहीं निमित्ताला । उपदेश अवलीला प्रकटिती ॥ ११० ॥
देव अथवा गुरू पाहे । भक्तां आधीन सर्वस्वी राहे ॥
भक्त कल्याण चिंता वाहे । सांकडीं साहे तयांचीं ॥ १११ ॥

आतां एक दुजें लहान । करितों साईचें वृत्त कथन ॥
कैसी एकाद्या कार्याची उठावण । करितां नकळतपण दावी ॥ ११२॥

असो सान वा तें मोठें । खरें कारण कधींही न फुटे ॥
कार्य मात्र हळू हळू उठे । वाच्यता न कोठें केव्हांही ॥ ११३ ॥

सहजगत्या एकादें काम । नियावें करावा उपक्रम ॥
न मूळ कारण निर्देश ना नाम । वरिवरी संभ्रम आणीक ॥ ११४ ॥

बोलेल तो करील काय । गरजेल तो वरसेल काय ॥
या रूढ म्हणीचा प्रत्यय । विना व्यत्यय साई दे ॥ ११५ ॥

बाबा सारिख्या अवतार मूर्ति । परोपकारार्थ जगीं अवतरती ॥
होतां इच्छितकार्या समाप्ती । अंतीं अव्यक्तीं समरसती ॥ ११६ ॥

आम्हा न ठावें मूळ कारण । कोठून आलों कोठें प्रयाण ॥
किमर्थ आम्हीं झालों निर्माण । काय कीं प्रयोजन जन्माचें ॥ ११७ ॥

बरें स्वच्छंदें जन्म कंठला । पुढें मृत्यूचा समय आला ॥
सकळ इंद्रियगण विकळ झाला । तरीही न सुचला सुविचार ॥ ११८ ॥

कलत्र पुत्र बंधू जननी । इष्टमित्रादि सकल स्वजनीं ॥
देह त्यागितां पाहूं नयनीं । तरीही न मनीं सुविचार ॥ ११९ ॥

तैसे नव्हती संतजन । ते तों अत्यंत सावधान ॥
अंतकालाचें पूर्णज्ञान । ठावें निज निर्वाण तयांतें ॥ १२० ॥

देह असेंतों अति भीति । भक्तांलागीं देहें झिजती ॥
देहावसानीं ही देहावस्थिति । निजभक्तहितीं लाविती ॥ १२१ ॥

देह ठेवावयाचे आधीं । कोणी अपुली बांधिती समाधी ॥
कीं पुढें निज देहा विश्रांति । मिळावी निश्चिती ते स्थानीं ॥१२२॥

तैसेंच पहा बाबांनीं केलें । परी तें आधीं कोणा नकळलें ॥
समाधि मंदिर बांधवून घेतलें । अघटित केलें तयांनीं ॥ १२३ ॥

ागपूरस्थ मोठे धनिक । वापूसाहेब बुट्टी नामक ॥
या हस्तें हें बाबांचें स्मारक । उभविलें देख बाबांनीं ॥ १२४ ॥
ापूसाहेब परम भक्त । साईचरणीं नित्यानुरक्त ॥
ाळे निज परिवारासहित । राहिले शिरडींत सेवेस ॥ १२५॥
रूनि साई चरणीं हेत । नित्यानुवर्ती तेथेंच वसत ॥
ुढेंही तैसेंच नित्यांकित । रहावें शिरडींत वाटलें ॥ १२६ ॥
्यावी एकादी जागा विकत । उठवावी एक छोटी इमारत ॥
स्वतंत्रपणें वसावें तेथ । आलें कीं मनांत तयांच्या ॥ १२७ ॥
येथें हें पेरिलें मूळ बीज । त्याचाच वृक्ष हें मंदीर आज ॥
दृश्य स्मारक भक्तकाज । साई महाराज प्रेमाचें ॥ १२८ ॥
कैसा कैसा याचा उभारा । झाला उपक्रम कवण्या प्रकारा ॥
कैसा हा आला या आकारा । वृत्तांत सांग अवधारा ॥ १२९ ॥
विचार हे ऐसे चित्तीं । दीक्षितांचिया माडीवरती ॥
वापूसाहेब निद्रिस्त स्थिति । दृष्टांत देखती मौजेचा ॥ १३० ॥
तेथेंच एका बिछान्यांत । माधवरावही असतां निद्रिस्त ॥
तयांसही तोच दृष्टांत । परमविस्मित दोघेही ॥१३१॥
बापूसाहेब स्वप्नं देखती ॥ बाबा तयांतें आज्ञापिती ॥
आपणही आपुला वाडा निश्चिती । देउळा समवेती बांधावा ॥१३२॥
होतां क्षणींच हा दृष्टांत । बापूसाहेब जाहले जागृत ॥
आमूल स्वप्न आठवीत । आसनस्थित निज शेजे ॥ १३३ ॥
इकडे ऐसें चाललें असतां । माधवराव ऐकिले रडतां ॥
बुट्टी तयांस जागे व्हा ओरडतां । निद्रितावस्था मावळली ॥ १३४ ॥
कांहो आपण कां रडत होतां । ऐसें माधवरावास पुसतां ॥
म्हणती श्रीचे प्रेमोद्गार परिसतां । प्रेमोद्रेकता पावलों ॥ १३५ ॥

१ माधवराव देशपांडे.

बाष्प गद्गद जाहला कंठ । नयनीं आसुवें वाहिलीं उद्भट ॥
प्रेम नावरे आवरितां उत्कट । जाहलें परिस्फुट रुदनांत ॥ १३६ ॥
येऊनि बाबा माझिया निकट । आज्ञा दिधली मजला स्पष्ट ॥
वाडा देऊळ होऊंद्या प्रकट । पुरवीन अभिष्ट सर्वांचें ॥ १३७ ॥
बापूसाहेब अंतरीं विस्मित । दोघांलागीं एकची दृष्टांत ॥
मन जाहलें संशयरहित । कार्यार्थोचित निश्चित ॥ १३८ ॥
बुट्टी स्वयें गर्भश्रीमंत । वाडा देऊळ बांधूं समर्थ ॥
माधवराव केवळ सुखवस्त । एकचि दृष्टांत उभयांतें ॥ १३९ ॥
परस्परांचीं स्वप्नें जुळलीं । परमानंदा भरती आली ॥
रूपरेखा निश्चित केली । योजना अनुमोदिली काकांनीं ॥ १४० ॥
असो उदयीक प्रातःकाळीं । तिघेही असतां बाबा जवळी॥
बाबा नित्य प्रेमसमेळीं । मुख न्याहाळीत शामाचें ॥ १४१ ॥
शामा वदे देवा हा खेळ । काय आहे तुझा अकळ ॥
झोंपही न घेऊं देसी निश्चळ । तेथेंही आम्हांतें बरळविसी ॥१४२॥
तेव्हां बाबा तें परिसुनी । हस्त ठेवीत आपुले कानीं ॥
वदत आम्ही आपुले ठिकाणीं । म्हणोत कोणी कांहींही ॥ १४३ ॥
असो मग ती पूर्वोक्त योजना । मांडिली बाबांचिया अनुमोदना ॥
जाहली तात्काळ बाबांची अनुज्ञा । समंदिर सदना बांधावया ॥१४४॥
माधवरावांनीं बांधिली कंबर । झाला तळमजला तळघर ॥
त्यांचेच हातून झाली विहीर । काम हें येथवर पोंहोंचलें ॥ १४५ ॥
लेंडीवरी जात असतां । अथवा तेथूनि मागें परततां ॥
खडक्या बाऱ्या दारें बसवितां । बाबा उत्सुकता अवलोकित ॥१४६॥

१ हरि सीताराम दीक्षित. २ माधवराव.

वदत करूनि तर्जनी वरी । येथें दार येथें बारी ॥
येथें पूर्वेस काढा ग्यालरी । शोभा वरी दिसेल ॥ १४७ ॥
पुढें कार्यकारण निमित्तें । बापूसाहेब जोगांचे हस्तें ॥
पुढील काम होणारें होतें । तें मग त्यांतें सोपविलें ॥ १४८ ॥
ऐसें काम होतां होतां । स्फुरण झालें बुट्टीच्या चित्ता ॥
यांतचि एक गाभारा धरितां । मुरलीधर स्थापितां येईल ॥ १४९ ॥
कल्पनेचा झाला उदय । परी न पुसतां बाबांचा मनोदय ॥
बुट्टी न आरंभित कांहींही कार्य । विना गुरुवर्य आज्ञापन ॥ १५० ॥
हा तो त्यांचा नित्यनेम । अनुज्ञा बाबांची हेंच वर्म ॥
नाहीं ऐसें एकही कर्म । त्याविण उपक्रम जयातें ॥ १५१ ॥
किमर्थ व्हावें मध्यें दालन । काय आहे त्याचें प्रयोजन ॥
दोन्ही कडील भिंती पाडून । करावें स्थापन मुरलीधरा ॥ १५२ ॥
दालनाचें व्हावें देवालय । बापूसाहेब यांचा मनोदय ॥
परी पुसावा बाबांचा आशय ॥ असल्यास निसंशय करावें ॥१५३॥
म्हणोनि वदले माधवरावा । आपण बाबांचा विचार घ्यावा ॥
मग पुढील आक्रम योजावा । रुचेल देवा तैशापरी ॥ १५४ ॥
बाबा फेरीवर असतां । वाडियाच्या सन्निध येतां ॥
द्वारानिकट स्वारी पावतां । काय पुसतात शामराव ॥ १५५ ॥
देवा बापूसाहेब वदती । दालनाच्या दोन्ही भिंती ॥
पाडूनि तेथें स्थापूं मीति । कृष्ण मूर्ति मुरलीधरा ॥ १५६ ॥
मध्य भागीं चौक साधून । करूं तेथें सिंहासन ॥
वरी मुरलीधर विराजमान । शोभायमान दिसेल ॥ १५७ ॥
ऐसें बापूसाहेब योजिती । परी पाहिजे आपुली अनुमती ॥
देऊळ वाडा दोनी येरीती । हातोहातीं होतील ॥ १५८ ॥

१ खिडकी. २ साईबाबांस.

ऐकूनि ही शामाची उक्ती । बाबा आनंदें वरें म्हणती ॥
देऊळ पूर्ण झालियावरती । येऊं कीं वस्तीस आपणही ॥ १५९ ॥

लावूनि वाडियाकडे दृष्टी । बाबा करीत मधुर गोष्टी ॥
वाडा पुरा झालिया पाठीं । आपुले साठींच तो लावूं ॥ १६० ॥

तेथेंच आपण बोलूं चालूं । तेथेंच आपण अवघे खेळूं ॥
प्रेमें आपापणा कवटाळूं । भोगूं सुकाळू आनंदाचा ॥ १६१ ॥

असो तेव्हां श्रीसाईप्रत । माधवरावजी ऐसेंही पुसत ॥
हेची जरी अनुज्ञा निश्चित । पायासी मुहूर्त करूं कीं ॥ १६२ ॥

बरी आहे ना देवा वेळ । फोडावया आणूं ना नारळ ॥
'फोडफोड' म्हणतां तात्काळ । आणूनि श्रीफळ फोडिलें ॥ १६३ ॥

असो पुढें झाला गाभारा । मुरलीधर देवाचा चौथरा ॥
मूर्तीही एका कारागिरा । सोपविली कीं करावया ॥ १६४ ॥

पुढें आली ऐसी वेळ । बाबांस आलें दुखणें प्रबळ ॥
निकट पातला अंतकाळ । अंतरीं तळमळ भक्तांच्या ॥ १६५ ॥

बापूसाहेब अस्वस्थचित्तीं । आतां पुढें या वाड्याची स्थिति ॥
काय होईल नकळे निश्चिती । म्हणोनि खंती उद्भवली ॥ १६६ ॥

इतउत्तर बाबांचे पाय । मंदिरास या लागती काय ॥
लाखों रुपये जाहले व्यय । अंती हा व्यत्यय पातला ॥ १६७ ॥

बाबांनीं देह ठेविल्यावर । कशास मुरलीधर वा घर ॥
कशास वाडा अथवा मंदिर । दुश्चित्त अंतर बुट्टीचें ॥ १६८ ॥

पुढें कर्मधर्मसंयोगें । अंतसमय साई नियोगें ॥
जाहलें वाड्याचिया महत्भाग्यें । मना जोगें सकळांच्या ॥ १६९ ॥

'मजला वाड्यांत द्या ठेवून' । हें अंतकाळींचें बाबांचें वचन ॥
निघतां बाबांचिया मुखांतून । जाहलें निश्चित मन सर्वांचें ॥ १७० ॥

मग तें पवित्र साई शरीर । जाहलें गाभारिया माजी स्थिर ॥
वाडा जाहला समाधि मंदिर । अगाध चरित्र साईचें ॥ १७१ ॥
धन्य भाग्य त्या बुट्टीचें । जयाचिया गृहीं स्वसत्तेचें ॥
विसावे शरीर श्रीसाईचें । नाम जयाचें अति पावन ॥ १७२ ॥
असो ऐसी ही कथा पावन । परिसोनि श्रोते सुखसंपन्न ॥
हेमाड साईनाथासि शरण । सोडी न चरण क्षणभरी ॥ १७३ ॥
घडोत्त भोग इष्टानिष्ट । साई एक राखितां संतुष्ट ॥
वर्ततां मार्गें यथोपदिष्ट। लाधेल अभिष्ट अचूक ॥ १७४ ॥
कथा वक्ता आणि वदन । जेथें साई समर्थ आपण ॥
तेथें हेमाड कोठील कवण । उगाच टोपण नांवाचा ॥ १७५ ॥
म्हणोनि पुढें होईल प्रेरणा । तैसीच कथा येईल श्रवणा ॥
वेळीं होईल जी जो रचना । तियेची विवंचना कां आज ॥ १७६ ॥

इतिश्री संतसज्जन प्रेरिते । भक्त हेमाडपंत विरचिते ॥
श्री साई समर्थसच्चरिते ।, गीता विशिष्ट श्लोकार्थ
निवेदनं नाम ॥ एकोनचत्वारिंशत्तमोध्यायः संपूर्णः ॥

श्रीसद्गुरुसाईनाथार्पणमस्तु । शुभंभवतु ॥

# शुद्धिपत्र.

श्लोक ७० च्या दोन चरणांमध्यें '(माधवराव)' छापलें आहे तें त्या श्लोकानंतर वाचावें.

| पृष्ठ. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| ४५० | १२ | कथि ऐसें | ऐसें कथि |
| ४५३ | १२ | नाथ | तेथ |
| ४५६ | १० | भला करेगा | तेरा भला करेगा |
| ४५७ | २२ | झालों | आलों |
| ४५८ | ८ | साधु चूडामणि | साधु-चूडामणि |
| ४५८ | १५ | कराडास | कवाडास |
| ४६० | .८ | अशिजया | अशि जया |
| ४६० | १५ | झाली होति | झालि होती |
| ४६३ | १९ | दोन | तीन |
| ४६४ | ४ | मदीयमस्तु साइनाथ | करोमि साइ वासुदेव |
| ४६४ | ५ | साइनाथा | साईं वासुदेवा |
| ४६४ | ११ | माझा | मी |
| ४६४ | ११ | असो | करतों |
| ४६४ | १४ | वाक्सुमनस्सम्मया कंठे | वाक्कुसुम सम्मया कंठे |

---

## श्री साईसच्चरित.

या श्री साईलीला मासिकांत प्रसिद्ध होत असलेला हेमाडपंतविरचित श्रीसाई सच्चरित नामक ओवीबद्ध ग्रंथ आतां संपत आला असून लवकरच तो पुस्तकरूपानें बांधवून श्री साईलीला आफिसांत विक्रीस ठेवण्यांत येणार आहे या सबंध ग्रंथाची पृष्ठें अजमासें ७०० वर होतील व यांत आरंभापासून अखेर पर्यंत प्रसिद्ध झालेले व होणारे सर्व फोटो व देखावे हेही प्रसिद्ध होतील. ग्रंथाची किमत रु. ३ ठेविली जाईल.

४।५ महिन्यांत पुस्तकें बांधून तयार होतील. आज फक्त ग्राहक होऊं इच्छिणारांनी खालील पत्त्यावर आपली नांवें व पत्ते नोंदवावेत. पुस्तकें बांधली जातांच व्ही. पी. नें रवाना केलीं जातील.

गोविंद रघुनाथ दाभोळकर
५ सेंट मार्टिन्स रोड (मुंबई नजीक) वांद्रें.